MHSO100002162013

**नि.दि.दा.क्र.५३/२०१३ मधील निशाणी क्र.२२१ खालील आदेश**

वादींनी सदरचा अर्ज मयत प्रतिवादी क्र.७ अशोक जगन्नाथ दुरापे व मयत प्रतिवादी क्र.१३ सर्जेराव पंढरीनाथ दुरापे यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे. त्यांनी सदरच्या अर्जात कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.७ हा ता.११.०१.२०२४ रोजी व प्रतिवादी क्र.१३ हा ता.२२.०१.२०२५ रोजी मयत झाला आहे. प्रतिवादी क्र.७ याला पुष्पा अशोक दुरापे, निशांत अशोक दुरापे व प्राजक्ता निखील मोरे असे वारस असून प्रतिवादी क्र.१३ याला अमोल सर्जेराव दुरापे, निर्मला संतोष मोरे, संध्या शिवाजी जगताप, दिपाली सचिन चव्हाण व रुपाली महेश मोरे असे वारस आहेत. प्रतिवादी क्र.७ व १३ च्या वारसांना समाविष्ट करण्यास व प्रतिवादी क्र.७ व १३ ची नावे सरनाम्यातून कमी करण्याबाबत दुरुस्ती करण्यास त्यांनी परवानगी मागितली आहे. म्हणून त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास प्रतिवादींनी नि.क्र.२२५ वर जबाब दिलेला असून त्यामध्ये म्हटले आहे की, सदरचे अर्जास त्यांची हरकत असुन त्याबाबत योग्य व संयुक्तीक कारण दिले नाही. प्रतिवादी क्र.७ व १३ चे वारस ९० दिवसांच्या आत अभिलेखावर न घेतल्यामुळे सदरचा दावा त्यांच्याविरुध्द अवसान झालेला आहे. प्रतिवादी क्र.७ व १३ हे मयत झाल्याबाबत वादींना माहिती होती. वादींनी जिल्हा न्यायालयातील किरकोळ दिवाणी अपील क्र.३३/२०१५ मध्ये सदरचे मयतांचे वारस अभिलेखावर घेतले आहेत. सदरचा अर्ज कायदेशीर नाही व त्यामुळे तो रद्द होण्यास पात्र आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
| --- | --- | --- | --- |
| १. | सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे काय? | ... | होय. |
| २. | आदेश काय? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ बाबतः–

४. मी वादींतर्फे विद्वान वकील श्री.कदम व प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री.फडे यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. प्रतिवादी क्र.७ हा ता.११.०१.२०२४ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. तसेच प्रतिवादी क्र.१३ हा ता.२२.०१.२०२५ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र.७ व १३ यांचे वारस वर नमुद केल्याप्रमाणे असल्याचे दिसुन येते. वादींना प्रतिवादी क्र.७ व १३ च्या वारसांविरुध्द सदरचा दावा चालविण्याचा अधिकार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.७ व १३ च्या वारसांची नावे मयत प्रतिवादी क्र.७ व १३ चे वारस म्हणुन दाव्यात समाविष्ट करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर ''होकारार्थी'' नोंदवित आहे.

### मुद्दा क्र.२ बाबतः–

५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. २ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

सदरचा निशाणी क्र.२२१ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2025.10.04 10:20:51 +0530

ता.०३.१०.२०२५.

(सो.द.घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, माळशिरस.

**नि.दि.दावा क्र.५३/२०१३.**

**नि.क्र.२२१ खालील आदेश**

.

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री.म.पां.सदाफुले.

कोर्टाचे नाव – दि. न्या. व. स्तर, माळशिरस.

न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा ता.०३.१०.२०२५.

न्यायनिर्णय टंकलिखित केलेला ता.०३.१०.२०२५.

न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा ता.०३.१०.२०२५.

न्यायनिर्णय अपलोड केल्याचा ता.०४.१०.२०२५.

स्वाक्षरीत/–

ता.०४.१०.२०२५.

(श्री.म.पां.सदाफुले)

लघुलेखक ग्रेड – २,

दिवाणी न्यायालय, व. स्तर, माळशिरस.